भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांक:- बीसीएच-२०१६/प्र.क्र. २९३/शिक्षण-२

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- १६ नोव्हेंबर, २०१७

वाचा:- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.:-
बीसीएच-२०१८/प्र.क्र. २९३/शिक्षण-२, दि. ६ जानेवारी, २०१७

शासन शुध्दीपत्रक:-

उपरोक्त वाचा मधील दि. ६ जानेवारी, २०१७ अन्वये १० वी नंतरच्या अभ्यासक्रमांना (११ वी, १२ वी) व १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना भोजन , निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना” राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सदर शासन निर्णयात योजनेच्या अटी व शर्ती मध्ये विद्यार्थ्यांची निवड या शिर्षाखाली नमूद सर्व स्तरावरील वसतिगृहामध्ये भाग घेणा-या विद्यार्थ्यास किमान ५० टक्के गुण असणे अनिवार्य आहे, असे वाचावे.

तसेच या व्यतिरिक्त योजनेच्या निकषांमध्ये पुढ़ील बाबींचा समावेश करण्यात येत आहे.

१. सदर योजनेसाठी निवड करताना सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज केलेल्या व प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचा या योजनेच्या निवडीसाठी प्राधान्याने विचार करावा.

२. महानगरपालिका /नगरपालिका/ एमएमआरडीए /पीएमआरडीए/ एनआयटी (Nagpur Investment Trust) यासारख्या प्राधीकरणाच्या हद्दीपासून २० कि. मी. परिसरात असलेल्या महाविद्यालयात शिकत असलेले विद्यार्थीखील योजनेचा लाभ मिळविण्यासाठी पात्र असतील.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१११६१५४८५०६९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justic and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d81b5c910bad5837d7f88ac97a75b312f0e5744ecbdc45b7704dcb27f5d4dfef, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2017.11.16 15:51:51 +05'30'

(अ. कों. आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. सचिव (सा. न्या. व वि. स. विभाग), मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, समाज कल्याण, पुणे
३.सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग
४.मा. मंत्री (सा. न्या. व वि. स. विभाग) यांचे खाजगी सचिव
५.मा. राज्यमंत्री (सा. न्या. व वि. स. विभाग) यांचे खाजगी सचिव

६. महालेखापाल (महाराष्ट्र -१/२), (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
७.सर्व सहायक आयुक्त, जिल्हा परिषद
८.सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
९.निवडनस्ती (शिक्षण-२)